51

# अग्रणी महाविद्यालय योजना २०१८

पदमश्री डॉ.ग.गो.जाधव महाविद्यायामध्ये शिवाजी विद्यापिठाच्या अग्रणी योजने अंतर्गत एक दिवसाची कार्यशाल गगनबावडा येथील पदमश्री डॉ.ग.गो.जाधव महाविद्यायामध्ये मराठी वाङ्मयातील अधुनिक प्रवाह या विषयावर २० ऑक्टोंबर २०१८ रोजी संपन्न झाली.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य. डॉ.एन.व्ही शहा हे होते. बीजभाषक म्हणून शिवशाहू महाविद्यालय सरूड येथील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.शिवकुमार सोनाळकर हे होते. त्यांनी मराठीतील प्राचीन वाङ्मयातील मुकुंदराजापासून ते अलकडील मराठी साहित्य यामध्ये कशाप्रकारे बदल होत गेले हे आपल्या बीजभाषणातून सांगितले.

प्रा.डॉ.गोमटेश पाटील, महावीर महाविद्यालय कोल्हापूर यांनी ग्रामीण साहित्यातील भारतीय ग्रामीण जीवन कशाप्रकारचे होते व आहे याचा आढावा घेतला व ग्रामीण साहित्य हे समाजजीवनाचा एक गाभा आहे हे पटवून दिले. प्रा.डॉ.प्रशांत नागावकर, के.एम.सी कॉलेज कोल्हापूर यांनी दलित साहित्य वेदना व विद्रोह या विषयावर आपले प्रखर विचार मांडले . दलित साहित्यामध्ये भाषाशैली खालच्या दर्जाची का आहे, त्यांच्यावर होणारा अन्याय व आत्याचार व वेदना नामदेव ढसाळ यांचे गोलपिठा, शरणकुमार लिंबाळे यांचे अक्करमासी, केशव मेश्राम यांचे 'मुक्कामपोस्ट देवाचे गोठणे' या सर्व साहित्यातून विद्रोह व वेदना कशाप्रकारे व्यक्त होत गेल्या या बद्दल आपले विवेचन मांडले. प्रा.डॉ.दिपककुमार वळवी, शहाजी कॉलेज कोल्हापूर यांनी अदिवासी साहित्य या विषयावर आपले विचार मांडले. गोंडवन या जमाती बद्दल व अशाच अनेक अदिवासी जमाती बद्दल त्यांनी त्यांचे धर्म, जात, ग्रंथ या सर्वावरच आपले विचारातून प्रकाशझोत टाकला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक प्रा.डी.बी.भोसले यांनी केले तर सुत्रसंचालन प्रा.डी.के. पाटील यांनी केल व आभार प्रा.ए.एस.कांबळे यांनी केले.प्रमाणपत्र वाटपानंतर कार्यक्रम समाप्त झाला.

Padmashri Dr. G.G. Jadhav Mahavidyalaya Est.2009 Gaganbawada, Dist- Kolhapur.

Principal
Padmashri Dr. G.G. Jadhav Mahavidyalaya
Gaganbawada, Dist Kolhapur

* अग्रणी महाविद्यालय योजना *

20 ऑक्टो 2018




अग्रणी महाविद्यालय योजनेचे उद्घाटन करताना प्रा. डॉ. गोमटेश पाटील प्रा. डॉ. शिवकुमार सोनाळकर प्राचार्य डॉ. एन. डी. शाता.




अग्रणी कार्यशाळेमध्ये 'आदिवासी जिवनसाहित्य' या विषयावर बोलताना प्रा. डॉ. दिपककुमार वळवी

Principal
Padmashri Dr. G.G. Jadhav Mahavidyalaya
Gaganbawada